MHGA070005092021

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | २२.०६.२०२१ |
| नोंदणी तारीख | २२.०६.२०२१ |
| निकाल तारीख | १५.०५.२०२६ |
| कालावधी | **०४ वर्ष, १० महिने, २३ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **निशाणी – २४ खाली** |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,**<br>**पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **२३१/२०२०**<br>पोलीस स्टेशन, अहेरी |
| न्यायनिर्णयाची तारीख | **१५.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १४७/२०२१** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>**पोलीस स्टेशन अहेरी,** |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. आर.एस. उंदिरवाडे,**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **१. निखील राजेश तोरे,**<br>वय २१ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,<br>**२. राहुल विस्तारी कन्नाके,**<br>वय २१ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>**३. विक्रम रामदास कन्नाके,**<br>वय २७ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>सर्व रा. अहेरी वार्ड क्र.१, अहेरी, ता. अहेरी<br>जिल्हा गडचिरोली. |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्रीमती जैनवार**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०३.०६.२०२० |
| पहिल्या खबरीची तारीख | ०३.०६.२०२० |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २२.०६.२०२१ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २५.०७.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०९.११.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | १५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख, | १५.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | निखील राजेश तोरे | .... | २२.०६.२०२१ | भा. दं. वि. चे कलम १८८, २७२ व २७३ व अन्न व सुरक्षा अधिनियमाचे कलम २६(२)(आय.व्ही),३, ३०(२)(अ),५९ अन्वये | निर्दोष | – | – |
| २. | राहुल विस्तारी कन्नाके | .... | २२.०६.२०२१ | भा. दं. वि. चे कलम १८८, २७२ व २७३ व अन्न व सुरक्षा अधिनियमाचे कलम | निर्दोष | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २६(२)(आय.व्ही),३, ३०(२)(अ),५९ अन्वये | | | |
| ३. | विक्रम रामदास कन्नाके, | .... | २२.०६.२० २१ | भा. दं. वि. चे कलम १८८, २७२ व २७३ व अन्न व सुरक्षा अधिनियमाचे कलम २६(२)(आय.व्ही),३, ३०(२)(अ),५९ अन्वये | निर्दोष | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | रविंद्र बालाजी चौधरी (**निशाणी २४ खाली**) | साक्षीदार |
| सा.क्र. २ | अजय वसंतराव तेलंगे (**निशाणी २४ खाली**) | साक्षीदार |
| सा.क्र. ३ | प्रभाकर भिमराव टेकुल (**निशाणी २४ खाली**) | पंच साक्षीदार |
| सा.क्र. ४ | व्यंकटेश पोचा गांडावार (**निशाणी २४ खाली**) | वाहन पंचनामा पंच |
| सा.क्र. ५ | प्रविण आजादराव उमप (**निशाणी २४ खाली**) | फिर्यादी |
| सा.क्र. ६ | कैलाश भिकाजी नरोटे (**निशाणी २४ खाली**) | तपासी अधिकारी |
| सा.क्र. ७ | बाजीराव सोमाजी सिडाम (**निशाणी २४ खाली**) | गुन्हा दाखल अधिकारी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–२५/सा.क्र.१** | पंचनामा |
| २. | निशाणी **पी–३५/सा.क्र.५** | दि.०४.०६.२०२० रोजीचे पत्र |
| ३. | निशाणी **पी–३६/सा.क्र.५** | तपासणी अहवाल |
| ४. | निशाणी **पी–३७/सा.क्र.५** | नोटीस |
| ५. | निशाणी **पी–३८/सा.क्र.५** | फार्म व्ही.ए. |
| ६. | निशाणी **पी–३९ व ४०/सा.क्र.५** | फार्म II and III |
| ७. | निशाणी **पी–४१/सा.क्र.५** | पत्र |
| ८. | निशाणी **पी–४२/सा.क्र.५** | मेमोरंडम पंचनामा |
| ९. | निशाणी **पी–४३/सा.क्र.५** | प्रथम खबर अहवाल |
| १०. | निशाणी **पी–४४ व ४५/सा.क्र.५** | राजपत्र व पत्र |
| ११. | निशाणी **पी–४८/सा.क्र.७** | प्रथम छापील खबर |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | वस्तु क्र.अ,ब,क | गाडीचे छायाचित्रे |

## न्यायनिर्णय

[आज दिनांक १५ मे, २०२६ रोजी उद्घोषित]

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम १८८, २७२ व २७३ व अन्न व सुरक्षा अधिनियमाचे कलम २६(२)(आय.व्ही), ३, ३०(२)(अ), ५९ प्रमाणे खटला चालवण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.०३.०६.२०२० रोजी संध्याकाळी १९.०० वाजताच्या सुमारास मौजा आलापल्ली, येथे आरोपीने सुगंधित तंबाखु माझा १०८ तंबाखुच्या ३८ पॉकेट वजन २०० ग्रॅम मिळून आला. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता

खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने त्याचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.१३ पुढे नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक दि.०३.०६.२०२० रोजी संध्याकाळी १९.०० वाजताच्या सुमारास मौजा आलापल्ली, येथे आरोपीने सुगंधित तंबाखु माजा १०८ तंबाखुच्या ३८ पॉकेट आणि इतर साहित्य अवैधपणे आढळले असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २. | वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपीने दर आदेश जारी करण्यास अधिकृत असलेल्या लोकसेवकाने जारी केलेला आदेश माहीत असूनही, तुमच्याकडे प्रत्येकी २०० ग्रॅम वजनाची सुगंधी माजा १०८ तंबाखूची ३८ पाकिटे आणि इतर साहित्य अवैधपणे आढळले असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| ३. | वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपीने, प्रत्येकी २०० ग्रॅम वजनाच्या सुगंधी माजा १०८ तंबाखूच्या ३८ पाकिटांमध्ये आणि इतर पदार्थांमध्ये, सदर पदार्थ अन्न म्हणून विकण्याच्या उद्देशाने, तो अन्न म्हणून अपायकारक बनवण्याच्या हेतूने भेसळ केली असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| ४. | आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली. |

## कारणमिमांसा

३. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेकामी सात साक्षीदारांची साक्ष नोंदवली. त्याचा तपशील उपरोक्त 'भाग क' मध्ये नमुद आहे.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करिताः</u>**

४. साक्षीदार क्र.१ **रविंद्र चौधरी** यांच्या पुराव्यात असे सांगीतले की, दि ०३.०६.२०२० रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यादिवशी त्यांना गुप्त माहिती मिळाली की खमनचेरु येथे मज्ञा सुगंधित तंबाखु बाळगुन वाहतुक होत होती अशी माहिती मिळाल्यान पंचांना बोलाविले आणि श्री. अजय तेलंगे व इतर पोलीस पंचांसह तिथे गेले. खमनचेरु जवळ दुचाकी थांबवुन झडती घेतली असता त्यांना १०८ हुक्का शिशा तंबाखु चे २० डबे मिळाले. त्याबाबत त्यांनी पंचनामा केला व त्या सात डब्यांपैकी एक डबा सिल करुन रासायनिक विश्लेषणासाठी राखला. त्यानंतर त्यांनी आरोपी व मालासह पोलीस ठाण्यात आले. त्यांनी पंचनामा नि.क्र.२५ वर सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर त्यांनी अन्न सुरक्षा विभागाला कळविले असता त्यांचे श्री. उपम आले व त्यांनी याबाबत खबर दिली होती. आरोपीकडुन घेण्यात आलेल्या त्याचे उलटतपासात त्यांनी उर्वरित सर्व प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. ?

५. साक्षीदार क्र.२ **अजय तेलंगे** हा पोलीस शिपाई आहे. त्याच्या पुराव्यात असे आले की, दि.०३.०६.२०२० रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यादिवशी त्यांना गुप्त माहिती मिळाली की खमनचेरु येथे मज्ञा सुगंधित तंबाखु बाळगुन वाहतुक होत होती. अशी माहिती मिळाल्याने ते इतर पोलीस पंचांसह तिथे गेले. खमनचेरु जवळ दुचाकी थांबवुन झडती घेतली असता त्यांना १०८ हुक्का शिशा तंबाखु चे २०० ग्रॅम ३८ डब्बे आरोपी क्र.२ व ३ यांच्याकडे मिळाले. तिथे सर्व कारवाई श्री. चौधरी यांनी केली. त्यानंतर त्यांनी आरोपी व मालासह पोलीस ठाण्यात आले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सर्व प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

६. साक्षीदार क्र.३ **प्रभाकर टेकुल** हा होमगार्ड आहे. त्याच्या पुराव्यात असे आले की, त्यांना पोलीसांनी कुठेही बोलाविले नव्हते. तसेच दि.०३.०६.२०२० रोजी त्याच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला नव्हता तसेच त्यांनी घटनास्थळ पंचनामा वरिल सही ओळखली परंतु मजकुर माहित नसल्याचे सांगीतले.

७. साक्षीदार क्र.४ **व्यंकटेश गांडावार** हा पंच साक्षीदार आहे. त्याच्या पुराव्यात असे आले की, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष सुप्रतनामा तयार केला नवहता. त्यांनी सुप्रतनाम्यावर आनपली सही ओळखली मजकुर माहित नसल्याचे सांगीतले.

८. साक्षीदार क्र.५ **प्रविण उमप** (फिर्यादी) यांच्या पुराव्यात असे आले की, दि. ०४.०६.२०२० रोजी ते चंद्रपुर येथे अन्न व औषध प्रशासन, चंद्रपुर येथे कार्यरत होते. दि. ०४.०६.२०२० रोजी पोलिस स्टेशन, अहेरी यांनी प्रतिबंधीत साठा पकडला होता व त्याविरूध्द कारवाई करण्याकरीता त्यांना पत्र दिले होते. त्यांना सहायक फौजदार, अहेरी यांचे मार्फत दि. ०४.०६.२०२० रोजी पत्र नि.क्र.३५ मिळाले होते. त्यांना पत्र मिळाल्यानंतर दि. २२.०७.२०२० रोजी पोलिस स्टेशन अहेरी येथे हजर झाले व संबंधीत पोलिस कर्मचा–यांची भेट घेतली व येण्याचा उद्देश सांगितला. पोलिस स्टेशनला आरोपी हजर होते. पोलिसांनी त्यांना तुमच्या ताब्यातुन जप्त केलेले प्रतिबंधीत मुद्देमाल व वाहन त्यांच्या ताब्यात दिले, त्यांनी तुम्हाला त्यांची ओळख दिली त्यानंतर त्यांना मिळालेले मुददेमालाची तपासणी केली व तपासणी अहवाल तयार केला. त्यांना तपासणी अहवाल नि.क्र.३६ वर सही व मजकुर बरोबर आहे.तपासणीच्या वेळी सुगंधीत तंबाखु, हुक्का शिशा टोबॅको माजाचे २०० ग्राम वजनाचे ३८ टिन आढळले. सदर अन्न पदार्थाचा अन्न सुरक्षा व मा.न. का अंतर्गत नमुना घेण्याचा मानस आरोपीसमक्ष जप्त करून चार सिलबंद टिन विकत मागितले. त्याकरीता त्यांनी आकारलेली किंमत रू.२२००/– त्यांनी त्यांना नगदी दिली व त्याबाबत पावती घेतली. त्यानंतर नमुन्याकरीता घेतलेला अन्न पदार्थ विचार करणारे नोटीस तयार करून एक प्रत आरोपींना दिली व त्यांच्या प्रतवर आरोपींकडून लिहून घेण्यात आले. त्यांना नोटीस रेफर रूल नं २४.१(४) नि.क्र.३७ वर सही असून त्यातील मजकर बरोबर आहे. त्यानंतर सदरचा अन्न पदार्थ अन्न सुरक्षा व म.न. कायदयात तपासणीसाठी घेत असल्याबाबत FORM VA तुम्हाला दिली. सदर FORM VA नि.क्र.३८ वर सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर नमुन्याकरीता घेतलेल्या अन्न पदार्थाला चार समान विभागात विभागुन प्रत्येक भागावर विहित लेबल लावले. त्यानंतर प्रत्येक भागाला जाळ खाकी कागदाने गुंडाळले व त्यावर पेपर स्लीप लावले. त्यानंतर प्रत्येक नमुना भागा जाड दो–याच्या सहयाने उभा व आडया गुंडाळुन जोड्याला गाठ लावली व त्यानंतर प्रत्येक नमुन्या भागावर लाखेच्या सहयाने चार सिला मारली. त्यापैकी एक सिल दो–याच्या गाठीवर आली आहे. नमुनाकरीता घेतलेला अन्न पदार्थ महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केला असल्यामुळे फार्म ॥ व ।।।

तयार करून जप्त करून त्यांच्या ताब्यात घेतला. त्यांना फार्म ॥ व ॥ नि.क्र.३९ व ४० वर सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर अग्न्न प्रतिबंधीत वाहतुक करणारे वाहन मी जप्त केले. सदरचे वाहन पत्रान्वये त्यांनी पो.स्टे.अहेरी येथे जमा केले. त्यांना सदर पत्र नि.क्र.४१ वर माझी सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर घटनेचा पंचासमक्ष पंचनामा तयार करण्यात आला. त्याची एक प्रत तुम्हा आरोपींना दिली. त्यांना मेमोरंडम पंचनामा नि.क्र.४२ वर सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर आरोपीविरूध्द पोलिस स्टेशन, अहेरी येथे प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला. त्यांना प्रथम खबर अहवाल नि.क्र.४३ त्यावर सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. सप्टेंबर २०२१ मध्ये त्यांनी त्यांचा पदभार श्री. तोरेम अन्न सुरक्षा अधिकारी यांना हस्तांतरीत केला. दि.०१.०८.२०११ रोजीचे महाराष्ट्र शासनाचे राजपत्र प्रमाणे त्यांची नियुक्ती अन्न सुरक्षा अधिकारी या पदावर झाली होती व त्यांच्याकडे अहेरी येथील अतिरिक्त पदभार होता. त्याचे पत्र अभिलेखावर दाखल केले. त्यांना राजपत्र नि.क्र.४४ आणि पत्र नि.क्र.४५ दाखविले व त्यातील मजकुर बरोबर आहे. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, त्याला पोलीसांनी सुगंधीत तंबाखु जपत केला असेल व कार्यालयात कळविले असेल तर लगेच जावून पुढची कार्यवाही करावी लागते. तसेच पोलीसांनी दि.०७.०६.२०२० ला कळविले होते आणि तो दि.२२.०७.२०२० ला दिले होते. त्यांनी मान्य केले की, नि.क्र.३६ वर पंचाचे नाव नमुद नाही. इतर सर्व प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

९. साक्षीदार क्र.६ **कैलाश नरोटे** (तपासी अधिकारी) आहेत त्यांच्या पुराव्यात असे आले की, त्यांना सदर प्रकरणाचा पुढील तपास मिळाला. तपासादरम्यान साक्षीदारांचे बयान नोंदविले. जप्त गाडी सुप्रतनाम्यावर सोडली. त्यांना गाडीचे छायाचित्र वस्तुक्रमांक अ, ब, क त्यामध्ये जप्त गाडी क्र.एम.एच. ३३ झेड ०६९८ दिसत आहे. आरोपीविरूध्द पुरावा मिळुन आल्यानंतर न्यायालयात दोषारापपत्र दाखल केले, त्यांच्या तपासात असे निष्पन्न झाले होते की, आरोपीच्या ताब्यात अवैद्य माजा १०८ सुगंधीत तंबाखु मिळुन आले होते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सर्व प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

१०. साक्षीदार क्र.७ **बाजीराव सिडाम** हे दाखल अधिकारी असून त्यांच्या पुराव्यात असे आले की, त्या दिवशी स्टेशन डायरी अंमलदार म्हणुन सकाळी ०८.०० ते १४.०० वाजेपर्यंत

कार्यरत होते. त्या दिवशी पोलिस स्टेशन, अहेरी येथे श्री. उमप यांनी लेखी फिर्याद दिली होती. त्याप्रमाणे गुन्हा क्र. २३१/२०२० कलम १८८,२७३ भा.दं. वि. नोंद झाला होता. त्यांनी प्रथम छापील खबर नि.क्र.४८ वर सही असून त्यातील मजकुर बरोबर आहे. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सर्व प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

११. सहा.सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच प्रकरण व त्यामध्ये दाखल सर्व दस्तऐवजांचे अवलोकन केले.

१२. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने एकूण सात साक्षीदार तपासले. सा.क्र.५ प्रविण उमक हे फिर्यादी आहे. त्याच्या पुराव्याचे आवलोकन केले असता असे दिसून येते की, घटना दि.०३.०६.२०२० रोजी घडली होती. पोलीसांनी त्यांना दि.०७.०६.२०२० रोजी कळविले होते व त्यानंतर दि. २२.०७.२०२० रोजी पोलीस स्टेशनला गेले. त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.७ बाजीराव सिडाम यांनी दि.२२.०७.२०२० रोजी प्रथम छापील खबर नि.क्र.४८ नोंदविले होते. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपीच्या ताब्यातुन दि.०३.०६.२०२० रोजी मुददेमाल जप्त करण्यात आला होता. परंतु दि.०७.०६.२०२० रोजी फिर्यादीला जपत मुददेमालाची माहिती देण्यात आली. अभिलेखावरून असे दिसूनयेते की, फिर्यादीला चार दिवस उशिराने माहिती देण्यात आली ती माहिती चार दिवस उशिरा का देण्यात आली होती याबाबत अभिलेखावर अभियोग पक्षाने पुरावा आणलेला नाही आणि तसे स्पश्टीकरण दिलेले नाही. पुढे असे आहे की, जेव्हा फिर्यादीला घटनेबाबत माहिती मिळाली तेव्हा त्याने पुढील कार्यवाही का केली नाही. फिर्यादीने आपल्या पुराव्यात मान्य केले की, पोलीसांनी त्यांना पत्राद्यारे कळविले होते परंतु त्याने आपल्या पुराव्यात कुठेही सांगीतले नाही की त्यांना ते पत्र कधी मिळाले होते. अभियोगाचे अवलोक केले असता असे दिसून येते की, घटना दि.०३.०६.२०२० रोजी घडली होती. परंतु त्याची दखल फिर्यादीद्वारे दि.२२.०७.२०२० रोजी घेण्यात आली. दि.०३.०६.२०२० रोजी पासुन ते दि.२२.०७.२०२० पर्यंत जवळपास एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी निघुन आला. परंतु त्या कालावधीत आरोपीच्या ताब्यात जप्त असलेला मुददेमाल कोणत्याही प्रकारची खोडतोड करण्यात

आली नव्हती याबाबत फिर्यादीने आपल्या पुराव्यात काही सांगीतले नाही. पुढे असे आहे की, फिर्याद दयायला एक महिन्यापेक्षा कालावधी का लागला याबाबत अभियोग पक्षाने अभिलेखावर साक्षदारामार्फत स्पष्टीकरण आणले नाही.

१३. अभियोग पक्षोन एकूण सात साक्षीदार तपासले. सा.क्र.१ रविंद्र चौधरी, सा.क्र.२ अजय तेलंगे, सा.क्र.६ कैलाश नरोटे आणि सा.क्र.७ हे सर्व पोलीस कर्मचारी आहेत. सा.क्र.३ प्रभाकर आणि सा.क्र.४ व्यंकटेश गंडालवार हे पंच साक्षीदार आहेत. परंतु सा.क्र.३ व ४ हे दोनही फितुर झाले त्यामुळे अभियोग पक्ष स्वतंत्र साक्षीदारामार्फत पंचनामा सिध्द करण्यास अपयशी ठरला.

१४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सात साक्षीदारापैकी पोलीस कर्मचारी आहेत व दोन पंच साक्षीदार आहेत. सा.क्र.१, २, ५,६ व ७ यांचा पुरावा तांत्रिक बाबीवर अवलंबुन आहे. परंतु सदर प्रकरणात जेव्हा घटना दि.०३.०६.२०२० रोजी घडली होती तेव्हा तक्रार एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीनंतर तक्रार उशिरा का नोंदविण्यात आली होती याबाबत अभिलेखावर पुरावा आणि स्पष्टकरण अभियोग पक्षाने आणलेला नाही त्यामुळे अभियोग पक्षाचे कथनावर संशय निर्माण होतो. पुढे असे आहे की, दि.०३.०६.२०२० रोजीपासुन ते दि.२२.०७.२०२० पर्यंत मुददेमाल खोडतोड करण्यता आली नव्हती. याबाबत, अभिलेखावर अभियोग पक्षाने पुरावा आणलेला नाही. एकंदरित आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी ही सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ ला नकारार्थी उत्तर देतो.

**मुद्दा क्र. ४ करिताः**

१५. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित

करणे योग्य होईल. सदर प्रकरणातील जप्त वाहन हे यापुर्वीच सुपुर्तनाम्यावर सोडण्यात आलेले आहेत व अपिल कालावधी संपल्यानंतर सदर वाहनाचा ताबा मुळ मालकाकडे कायम करणे उचित होईल. म्हणून, मुद्दा क्र.४ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. आरोपी क्र.**१ निखील राजेश तोरे, आरोपी क्र. २. राहुल विस्तारी कन्नाके व आरोपी क्र.३. विक्रम रामदास कन्नाके, यांना** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम १८८, २७२ व २७३ व अन्न व सुरक्षा अधिनियमाचे कलम २६(२)(आय.व्ही), ३, ३०(२)(अ), ५९ नुसार दंडनिय अपराधातुन निर्दोष ठरवून मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जुनी जामिनपत्र रद्द करुन जामिनदारास मुक्त करण्यांत येते.

३. आरोपींनी फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी प्रत्येकी रूपये १५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. सदर प्रकरणातील जप्त वाहन हे यापुर्वीच सुपुर्तनाम्यावर सोडण्यात आलेले आहेत व अपिल कालावधी संपल्यानंतर सदर वाहनाचा ताबा मुळ मालकाकडे कायम करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.15 16:52:24 +0530

दि.१५.०५.२०२६

(एस.एम.एच.शाहिद)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी